**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह’ निमित्ताने विद्यापीठात विविध कार्यक्रमांचे आयोजन

अमरावती.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाद्वारे राज्यामध्ये ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह’ साजरा करण्याबाबत शासन निर्णयानुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली समितीने ठरविल्यानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

विद्यार्थी वसतीगृहाद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुस्तक व ग्रंथ प्रदर्शनीचे उद्‌घाटन, डॉ.एम.आर. इंगळे यांचे व्याख्यान, अठरा तास वाचन, निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा व इतर स्पर्धा, स्वच्छता अभियान आदी कार्यक्रम, डॉ. आंबेडकर अभ्यासकेंद्राद्वारे अठरा तास वाचन, निबंध स्पर्धा व बक्षिस वितरण समारंभ, संविधान उद्देशिका वाचन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी इर्विन चौक येथे गंथप्रदर्शनी व चित्रप्रदर्शनीचे स्टॉल उभारण्यात येणार आहे.

रा.से.यो. विभागाद्वारे ग्रामांमध्ये स्वच्छ भारत योजना, दत्तक ग्रामांमध्ये सहभोजन कार्यक्रम, रक्तदान कार्यक्रम, इर्विन चौक येथे स्टॉल मधून संविधान उद्देशिका व विद्यार्थीहितार्थ योजनांचे मुद्रित पॉम्प्लेटचे वितरण, सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना दत्तकग्राम योजनेच्या माध्यमातून ग्रामस्थांपर्यंत पोहोचवणे, बार्टीद्वारे पथनाट्यातून बाबासाहेबांचे विचार व शासकीय योजनांचे सादरीकरण आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी रा.से.यो. चे विद्यार्थी स्वच्छता अभियान राबवतील.

विद्यापीठ मागासवर्ग शिक्षकेत्तर कर्मचारी संघाच्यावतीने भूमिपूत्र कॉलनी येथील स्पर्धा परीक्षा केंद्रात पुस्तक वाटप करणे, याशिवाय दोन मुलींचे शिक्षण, भोजन, निवास, खेळ, व्यक्तिमत्व विकास यासाठी प्रत्येकी रु. २६०००/- प्रमाणे एकूण ५२०००/- रुपयांची आर्थिक मदत करणे. विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचारी संघाच्यावतीने मंगरुळ चव्हाळा येथे श्री मतिन भोसले द्वारा संचालित प्रश्नचिन्ह आश्रमशाळेला पंखे, भोजन, फळे आदींचे वितरण करणे.

दि. १३ एप्रिल, २०१८ रोजी दु. ४.०० वाजता डॉ.के.जी. देशमुख सभागृहात व्याख्यानाचे आयोजन ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतावादी दृष्टीकोन’ या विषयावर करण्यात आले आहे. याप्रसंगी महामानवाला अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केला असून गरजूंसाठी एक पेन व वही प्रत्येकांना आणावयाची आहे. दि. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य महात्मा फुले यांची व दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करणे, ग्रंथालय विभागाद्वारे व्याख्यान कार्यक्रमप्रसंगी क्रांतीसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील ग्रंथांचे डॉ.के.जी. देशमुख सभागृहासमोर ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या सर्व कार्यक्रमांचा नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी केला आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ११/०४/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी